चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२६ सप्टेंबर, २०१७
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# कौटुंबीक वाद मिटविण्यासाठी खंडणी मागणाऱ्या महिलेविरूध्द चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद

चंद्रपुर शहरात राहणारे एक पती पत्नी यांचे कौटुंबीक कारणावरून आपसात मतभेद झाल्याने त्यांचे आपसात पटत नव्हते. त्यामुळे त्यांचे प्रकरण महिला तक्रार निवारण समितीकडे समुपदेशनाकरीता सुरू असतांना चंद्रपुर शहरातील एक महिला सामाजिक कार्यकर्ता हिने कौटूंबीक वाद चालु असलेल्या पत्नी सोबत संपर्क करून तुमचा वाद मिटवुन देतो, परंतु त्याचे मोबदल्यात पोलीसांना पैसे दयावे लागतील अशी खोटी बतावणी करून पोलीसांच्या नावावर स्वत:करीता पैशाच्या स्वरूपात खंडणीची मागणी केली. आधीच कौटुंबीक वादामुळे विवंचनेत असलेल्या विवाहीत महिला हिने महिला तक्रार निवारण केंद्र येथे धाव घेतली.

पोलीसांनी प्रकरणाचे गांभीर्य समजुन लाचलुचपत प्रतिंबधक विभागाचे मदतीने सापळा रचुन कौटुंबीक वाद मिटविण्याच्या मोबदल्यात पैशाच्या स्वरूपात खंडणी मागणाऱ्या महिलेविरूध्द कायदेशीर कार्यवाही करीत विवाहीत महिला हिचे फिर्याद वरून चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन येथे कलम ३८४ भादंवि प्रमाणे खंडणी मागणाऱ्या महिलेविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास चंद्रपुर शहर पोलीस करीत आहेत.

---